# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२८२१७२८, २२८२११६७
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३११५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


**दरपत्रक क्रमांक : ९/२०१७**

**क्रमांक : सीसीटी-७८१७/सी.आर.१०/२०१७/तेवीस** **दिनांक : १७ जुलै, २०१७**

**- आयोगाच्या कार्यालयातील सी.सी.टि.व्ही. कॅमे-यांच्या सुट्या भागांसह देखभाल व दुरुस्तीकरीता संस्था ठरविण्याबाबत [Comprehensive AMC] -**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कुपरेज व बँक ऑफ इंडियाच्या कार्यालयातील एकूण ३६ सी.सी.टि.व्ही. कॅमे-यांच्या तसेच ०३ डि.व्हि.आर. तसेच तद्नुषंगिक सामुग्रीच्या सुट्या भागांसह देखभाल व दुरुस्तीकरीता करार झाल्यापासून पुढील एक वर्षाच्या कालावधीकरीता करण्यासाठी द्वि-लिफाफा पद्धतीने दरपत्रके मागविण्यात येत आहेत. दरपत्रके सादर करावयाचा शेवटचा **दिनांक २४ जुलै, २०१७** रोजी **दुपारी ४.०० वाजेपर्यंत** असून तोपर्यंत प्राप्त झालेली दरपत्रके **दिनांक २५ जुलै,२०१७** रोजी **दुपारी ३.०० वाजता, सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई** यांच्या दालनात उघडण्यात येतील. दरपत्रके स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा सर्वच दरपत्रके नाकारण्याचा हक्क सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग राखून ठेवत आहे. तसेच संस्थांच्या सेवेतील कामगिरीच्या अनुषंगाने सदरहू दरपत्रिकेचा कालावधी एकमेकांच्या सहमतीने व या दरपत्रकातील तरतुदींच्या अनुषंगाने आणखी एक वर्षासाठी वाढविता येईल. तसेच दरपत्रक धारकाशी अनुबंध झाल्यानंतर देखभाल दुरुस्तीमध्ये कुठल्याही प्रकारच्या समस्या उद्भवल्यास दरपत्रक धारकासोबतचा करार तात्काळ संपुष्टात आणण्याबाबत व तद्नंतर सर्वात कमी दर असलेल्या क्रमांक दोनवरील दरपत्रकधारकाशी अनुबंध करण्याचा हक्क सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेकडे राहील. दरपत्रकाचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| Quotation for Comprehensive AMC for CCTV System | | | (INR) | | |
|---|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Description** | **Qty.** | **Rate** | **GST** | **Total Amount** |
| 1 | 1/3" Interline CCD 540 TVL Camera [Model No HD3DX] Make- Honeywell | 28 | Rate should be Quoted in Lumsum | | |
| 2 | 1.3 MP IR Cosmic HD Dome, 3.6mm, 20 M IR Camera [Resolution upto1080p/720p@25/30fps] Make- CP PLUS, Model: CP-VCG-SD13L2 | 07 | | | |
| 3 | 2.0 MP MP Astra HD Plug and Play Dome Camera [Resolution upto1080p/720p@25/30fps] Make- CP PLUS, Model: CP-VCG-SD13L2 | 01 | | | |
| 4 | 16 Channel DVR, Make : Honeywell | 01 | Rate should be Quoted in Lumsum | | |
| 5 | 16 Channel DVR- CP PLUS 720P(HD) Coral HDCVI high Definition, Model :CP-UVR1601C1 [16 Ch Video, 1Ch Audio, 1HDD] | 01 | | | |
| 6 | 04 Channel DVR- CP PLUS Cosmic HD DVR Model: CP-UVR-0801E1S-S [04 Ch Video, 1Ch Audio, 1HDD] | 01 | | | |
| | | | | **Grand Total** | |

२…..

२. या संदर्भात आयोगाबरोबर करार झाल्यापासून पुढील एक वर्षाच्या कालावधीकरिता उपरोक्त दराप्रमाणे कॅमेरे व डि.व्हि.आर. यांची देखभाल व सुट्या भागांसह दुरुस्ती करणे दरपत्रकधारकास बंधनकारक राहील. तसेच उद्योग संचालनालय किंवा माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडून यासंदर्भात कोणत्याही संस्थेसोबत दरकरार लागू करण्यात आल्यास त्या दिवसापासून दरपत्रक धारकाबरोबर केलेला [व्यक्ती व कंपनी] दरकरार संपुष्टात येईल व तसे यासंदर्भात सूचित करण्यात येईल. तरी उपरोक्त दरपत्रक सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, ७ वा मजला, [माहिती तंत्रज्ञान कक्ष] कुपरेज फूटबॉल ग्राउंड समोर, महर्षी कर्वे रोड, कुपरेज, मुंबई- ४०० ०२१ यांच्या नावाने मोहोरबंद पाकीटातून **दिनांक २४ जुलै, २०१७** रोजीपर्यंत दुपारी **४.००** वाजेपर्यंत पाठविण्यात यावे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : १७ जुलै, २०१७

सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

सोबत : अटी व शर्ती.

## -: अटी व शर्ती :-

१. मोहोरबंद लिफाफ्यावर **"सी.सी.टि.व्ही. कॅमे-यांच्या देखभाल व दुरुस्तीकरीता [सुट्या भागांसह] तसेच चित्रिकरण संग्रहासाठी HDD करीता दरपत्रक [Comprehensive AMC]"** असे लिहिणे आवश्यक आहे. तांत्रिक [Technical] व आर्थिक [Commeracial] असे स्वतंत्र दोन लिफाफे सादर करणे अत्यावश्यक आहे.

२. फक्त मुंबईस्थित संस्थांचाच विचार करण्यात येईल. दरपत्रक भरणा-या संस्थेकडे मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ नुसार दुकानाची मुंबई येथील नोंदणीच्या प्रमाणपत्राची प्रत असणे आवश्यक आहे.

३. संस्थेकडे सूक्ष्म,लघु और मध्यम उद्यम मंत्रालय, भारत सरकार [Ministry of Micro, Small & Medium Enterprises (MSME)] यांच्याकडे नोंदणी केलेले उद्योग आधार प्रमाणपत्र आवश्यक आहे.

४. दरपत्रके भरुन सादर करावयाचे ठिकाण : **सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, ७ वा मजला, माहिती तंत्रज्ञान कक्ष, कुपरेज फूटबॉल ग्राउंड समोर, महर्षी कर्वे रोड, कुपरेज, मुंबई- ४०० ०२१** येथे **दिनांक २४ जुलै, २०१७** रोजीपर्यंत **दुपारी** ४.०० वाजेपर्यंत जमा करावेत. त्यानंतर आलेली दरपत्रके स्वीकारण्यात येणार नाहीत.

५. प्राप्त दरपत्रके **दिनांक २५ जुलै, २०१७** रोजी **दुपारी ३.००** वाजता **सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, महानगर टेलिफोन निगम इमारत, ८ वा मजला, कुपरेज फूटबॉल ग्राउंड समोर, महर्षी कर्वे रोड, कुपरेज, मुंबई- ४०० ०२१** यांच्या दालनात उघडण्यात येतील. दरपत्रिका उघडते वेळी कंपनीचा मालक स्वत: किंवा त्यांचा प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतो.

६. दरपत्रिकेत दर GST सहित नमूद करावेत. दरपत्रिकेमध्ये नमूद करण्यात आलेले दर हे स्वीकृतीनंतर एक वर्षासाठी अस्तित्वात राहतील. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होणार नाही. तसेच सर्व सुटे भाग मूळ उत्पादित [OEM Standard] असावीत.

६. पात्र संस्थेने आयोगाच्या कार्यालयात एक वर्षाच्या कालावधीत प्रत्येक महिन्यात [Monthly Visit] देवून कॅमे-यांची व डि.व्हि.आर. ची पाहणी करणे आवश्यक राहिल.

७. देखभाल व दुरुस्तीची देयके त्रैमासिक पद्धतीने [Quarterly Bill] आगाऊ मुद्रांक पावतीसह सादर करावे. कोणत्याही परिस्थितीत आगाऊ रक्कम अदा करण्यात येणार नाही.

८. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

९. दरपत्रके सादर करताना लिफाफा सीलबंद करुन सादर करावेत.

१०. एक वर्षाच्या कालावधीमध्ये सुट्या भागांच्या किंमतीमध्ये कोणत्याही अपरिहार्य कारणामुळे दरवाढ झाल्यास पात्र संस्थेने दरपत्रिकेमध्ये सादर केलेल्या दरामध्ये कोणत्याही प्रकारची दरवाढ करुन देता येणार नाही.

११. यशस्वी विक्रेत्यास निविदेतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत स्वतंत्रपणे रुपये १००/- च्या स्टँप पेपरवर करारनामा [Contract] करुन देणे बंधनकारक राहील.

१२. चालू वर्षाचा करार संपल्यावर जर मुदतवाढ मिळाल्यास पुरवठादाराला त्यांनी मान्य केलेल्या दरानेच देखभाल व दुरुस्ती करणे बंधनकारक राहिल.

१३. प्रत्येक वेळी आयोगाच्या कार्यालयास भेट दिल्यानंतर कॉल रिपोर्ट/सर्व्हिस रिपोर्ट तयार करुन माहिती तंत्रज्ञान कक्ष, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्याकडे सादर करणे बंधनकारक राहील.

१४. पुरवठा करण्यात आलेल्या कोणत्याही सुट्या भागांमध्ये कोणतीही समस्या उद्भवल्यास तात्काळ तो बदलून देण्याची कार्यवाही करावी.

१५. कार्यालयातील कॅमेरे किंवा डि.व्हि.आर. बंद पडल्यास किंवा त्यामध्ये कोणतीही समस्या उद्भवल्यास संस्थेने त्यांचा प्रतिनिधी तात्काळ आयोगाच्या कार्यालयात पाठविणे आवश्यक राहील. तसेच पाठविण्यात येणा-या प्रतिनिधींचे भ्रमणध्वनी क्रमांक, कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक यांच्या बदलाबाबतची माहिती आयोगास वेळोवेळी कळविणे अत्यावश्यक राहील.

१६. विहित कालावधीत प्राप्त झालेल्या सिलबंद लिफाफ्यातील प्रथम तांत्रिक लिफाफा उघडण्यात येईल व फक्त तांत्रिक छाननीमध्ये पात्र ठरलेल्या/ठरणा-या विक्रेत्यांच्याच [Vendor] आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

१७. तांत्रिक व आर्थिक दरपत्रकाच्या प्रत्येक पानावर कंपनीचे नाव, पत्ता, सही व गोल शिक्का असणे बंधनकारक राहील.

१८. तांत्रिक व आर्थिक दरपत्रकांमध्ये कोणतीही त्रूटी आढळल्यास किंवा खोटी/चुकीची माहिती सादर केल्यास किंवा हेतुपुरस्सर माहिती लपविल्यास, याबाबतीत खरेदी समितीचा निर्णय अंतिम असेल.

१९. खरेदी प्राधिका-यासोबत हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत आणि इच्छुक संस्थेने एकल निविदा सादर केल्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे. (हमीपत्राचा नमूना शेवटी जोडला आहे)

## लिफाफा क्रमांक १ मध्ये खालील कागदपत्रे सादर करावीत :- [तांत्रिक लिफाफा]

१. आस्थापना व दुकाने अधिनियम, मुंबई लायसन्स प्रमाणपत्राची प्रत.

२. निविदेच्या अंतिम तारखेपर्यंत ग्राह्य असलेले आयकर भरण्यासंबंधीचे प्रमाणपत्राची प्रत/तसेच मागील तीन वर्षाची आयकर विवरणपत्रे [**Form 16 A & Indian Income Tax Return Acknowledgment**] व पॅनकार्डची प्रत सोबत जोडावी लागेल.

३. Provisional ID व GST Number याची प्रत जोडणे आवश्यक राहील. तसेच आवश्यकता वाटल्यास त्यासंदर्भातील अधिक कागदपत्रांची मागणी खरेदी समितीकडून करण्यात येईल.

४. सूक्ष्म,लघु और मध्यम उद्यम मंत्रालय, भारत सरकार [Ministry of Micro, Small & Medium Enterprises (MSME)] यांच्याकडे नोंदणी केलेले **उद्योग आधार प्रमाणपत्र.**

४. खरेदी प्राधिका-यासोबत हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत आणि इच्छुक संस्थेने एकल निविदा सादर केल्याबाबत हमीपत्र. [कंपनीच्या लेटरहेडवर]

५. यापूर्वी ज्या शासकीय/निमशासकीय/खाजगी कार्यालयांमध्ये देखभाल व दुरुस्तीचे काम केले आहे. अशा कार्यालयांची नावे व समाधानकारक काम केले असल्याचे त्यांचे प्रमाणपत्र.

---

## लिफाफा क्रमांक २ मध्ये खालील माहिती सादर करावीत :- [आर्थिक लिफाफा]

| Quotation for Comprehensive AMC for CCTV System | | | (INR) | | |
|---|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Description** | **Qty.** | **Rate** | **GST** | **Total Amount** |
| 1 | 1/3" Interline CCD 540 TVL Camera [Model No HD3DX] Make- Honeywell | 28 | Rate should be Quoted in Lumsum | | |
| 2 | 1.3 MP IR Cosmic HD Dome, 3.6mm, 20 M IR Camera [Resolution upto1080p/720p@25/30fps] Make- CP PLUS, Model: CP-VCG-SD13L2 | 07 | | | |
| 3 | 2.0 MP MP Astra HD Plug and Play Dome Camera [Resolution upto1080p/720p@25/30fps] Make- CP PLUS, Model: CP-VCG-SD13L2 | 01 | | | |
| 4 | 16 Channel DVR, Make : Honeywell | 01 | Rate should be Quoted in Lumsum | | |
| 5 | 16 Channel DVR- CP PLUS 720P(HD) Coral HDCVI high Definition, Model :CP-UVR1601C1 [16 Ch Video, 1Ch Audio, 1HDD] | 01 | | | |
| 6 | 04 Channel DVR- CP PLUS Cosmic HD DVR Model: CP-UVR-0801E1S-S [04 Ch Video, 1Ch Audio, 1HDD] | 01 | | | |
| | | | | **Grand Total** | |

******************

**कंपनीच्या लेटरहेडवर**

दिनांक :-

# <u>हमीपत्र</u>

**मी/आम्ही, असे हमीपत्र लिहून देतो की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील खरेदी प्राधिका-यासोबत आमचा हितसंबंधाचा कोणताही संघर्ष नाही. तसेच सदर निविदेकरीता आम्ही एकल दरपत्रक दिलेले आहे.**

आपला विश्वासू

**Seal**

(प्रोप्रायटर)